जगभरात गाजलेले सिनेमे यंदा 'पिफ'मध्ये

- कृष्णाई परळकर

१८ ते २५ जानेवारी दरम्यान पुण्यातील ११ स्क्रीनवर पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (पिफ) होत असून, २०२३ मध्ये जगभरातील गाजलेले सिनेमे यंदा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दिसणार आहेत. यातील अनेक चित्रपटांना विविध आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

१. **'अबाउट ड्राय ग्रासेस'** - फ्रान्समध्ये पार पडलेल्या ७६ व्या 'कान्स फिल्म फेस्टिवल'मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मर्वे दिझरार यांना 'अबाउट ड्राय ग्रासेस' या चित्रपटासाठी मिळाला आहे. हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या पहिल्या तुर्की महिला ठरल्या आहेत. 'अबाउट ड्राय ग्रासेस' हा नुरी बिल्ज सिलान दिग्दर्शित तुर्की भाषेतील चित्रपट आहे.

२. **'मॉन्स्टर'** - कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रवेश केलेल्या निवडक एलजीबीटीक्यु चित्रपटांसाठी क्विअर पाम हे स्वतंत्रपणे पारितोषिक देण्यात येते. २०२३ मध्ये हे पारितोषिक हिरोकाझु कोरीएडा दिग्दर्शित 'मॉन्स्टर' या चित्रपटाला देण्यात आले. तसेच सर्वोत्तम पटकथा पारितोषिक युजी शाकामोटो यांना 'मॉन्स्टर' चित्रपटासाठी मिळाले. या चित्रपटाची कथा एका आईभोवती फिरते, जी आपल्या मुलाच्या वागण्यात अचानक झालेला बदल बघून शाळेतील शिक्षकाला आव्हान देते.

३. **'हाऊ टू हॅव सेक्स'** - मॉली मॅनिंग वॉकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'हाऊ टू हॅव सेक्स', या चित्रपटाचा जागतिक प्रीमियर कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये झाला, त्याला अन सरटेन रिगार्ड हे पारितोषिक मिळाले. या चित्रपटात मिया मॅककेना-ब्रूस, लारा पीक, सॅम्युअल बॉटमले, शॉन थॉमस, एन्व्हा लुईस आणि लॉरा अम्बलर यांच्या भूमिका आहेत. पौगंडावस्थेतील तीन ब्रिटिश मुलींची आपल्या सुट्ट्या मजेत घालवण्याविषयीची ही कथा आहे.

४.**'ऑन द अडमंट'** - हा निकोलस फिलिबर्ट दिग्दर्शित फ्रेंच भाषेतील माहितीपट आहे. हा माहितीपट बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा गोल्डन बिअर पुरस्कार विजेता ठरला आहे. पॅरिसमधील सीन नदीवर स्थित अडमंट डे सेंटर स्ट्रक्चरचे चित्रण यामध्ये आहे. मानसिक विकार असलेल्या प्रौढांच्या उपचारांसाठी हे एक विशेष डे केअर सेंटर आहे.

५. **'अ फायर'** - या ख्रिश्चन पेटझोल्ड दिग्दर्शित चित्रपटाने ७३व्या बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सिल्व्हर बेअर ग्रँड ज्युरी पारितोषिक जिंकले. ज्यात थॉमस शुबर्ट, पॉला बिअर, लँगस्टन उइबेल आणि एन्नो ट्रेब्स यांनी भूमिका केल्या आहेत. नातेसंबंधांवर आधारीत नाट्य असणार हा

चित्रपट चार लोकांवर केंद्रित आहे, बाल्टिक समुद्राजवळच्या जंगलातील आगीमुळे, हे चार जण त्यांच्या हॉलिडे होममध्ये अडकलेले आहेत.

६. **'हिअर'** - बास डेव्हॉस दिग्दर्शित हिअर या चित्रपटाला बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात एन्काऊंटर या श्रेणीतील पारितोषिक मिळाले आहे. एक रोमानियन बांधकाम कामगार आणि एक बेल्जियन-चिनी डॉक्टरेट विद्यार्थी ब्रुसेल्समध्ये आपल्या पूर्वीच्या घरी परत कसे जातात, याची ही कथा आहे.

७. **'सिरा'** - हा चित्रपट अपोलिन ट्रॉरे यांनी लिहिलेला आणि दिग्दर्शित केला आहे आणि त्यात नफिसाटौ सिसे, माईक डॅनन, लाझारे मिनोनगौ, नॅथली वैराक आणि रुथ वर्नर यांनी अभिनय केला आहे. या चित्रपटाला बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पॅनरोमा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. चित्रपटाची कथा सिरा नावाच्या तरुण मुलीभोवती फिरते. जिने एका क्रूर हल्ल्यानंतर तिच्या नशिबाला शरण येण्यास नकार दिला आणि त्याऐवजी इस्लामी दहशतवादाविरुद्ध भूमिका घेतली, त्याची ही कथा आहे.

८. 'ब्लागाज लेसन' - चित्रपट स्टीफन कोमांडारेव यांनी दिग्दर्शित केला आहे आणि या चित्रपटाला कार्लोवी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा तर एली स्कोर्चेवा हिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार स्टीफन कोमांडारेव यांना मिळाला आहे. या चित्रपटात एली स्कोर्चेवा शुमेनमधील निवृत्त शालेय शिक्षिका 'ब्लागा', या भूमिकेत आहे, जी तिच्या पतीच्या नुकत्याच झालेल्या मृत्यूमुळे दुःखात आहे आणि त्याच्या स्मशानभूमीतील जागेसाठी पैसे गोळा करण्याचा प्रयत्न करत असताना गुन्हेगारी घोटाळ्याला बळी पडते.

असे अनेक गाजलेले चित्रपट यावर्षी पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आहेत. हे सर्व चित्रपट २०२३ या वर्षामध्ये तयार झालेले आहेत. यातले अनेक चित्रपट हे भारतामध्ये प्रथमच दाखविले जाणार आहेत.